# ॥ प्रेसनोट ॥

महाराष्ट्र वैद्यकीय व्यावसाय अधिनियम १९६१ च्या कलम ३३ (१) नुसार वैद्यकीय व्यासायिकांना संबंधित वैद्यकीय परिषदेकडे नोंदणी करुन घेणे आवश्यक आहे. त्यानुसार १) महाराष्ट्र वैद्यक परिषद, २) महाराष्ट्र समचिकीत्सा परिषद, ३) महाराष्ट्र भारतीय चिकीत्सा परिषद, ४) महाराष्ट्र दंतवैद्य परिषद या चार वैधानिक परिषदांकडे राज्यात/जिल्ह्यात कार्यरत असणाऱ्या वैद्यकीय व्यावसायिकांनी नोंदणीकरण करणे आवश्यक आहे. नोंदणीकृत वैद्यक व्यावसायिकांव्यतीरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस राज्यामध्ये वैद्यकीय व्यावसाय करण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत मा. आयुक्त यांच्या आदेशाने बोगस व्यावसायिकांचा शोध घेणे व प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याचे निर्देश वैद्यकीय अधिकारी, नागरी आरोग्य केंद्र (सर्व) यांना देण्यात आले आहेत. त्यांच्यामार्फत कार्यक्षेत्रातील रुग्णालय व क्लिनिक ला भेट देऊन बोगस डॉक्टर्स शोधण्यासाठी वैद्यकीय व्यावसायिकांची अर्हता तपासणी करण्याचे काम निरंतर चालू आहे.

बोगस व्यवसायिकांचा शोध मोहिमेंतर्गत नागरी आरोग्य केंद्र, नवघर येथील वैद्यकीय अधिकारी यांनी खाजगी वैद्यकीय व्यावसायीक एम. झेड शेख, शॉप नं.१, सी-वींग, चंद्र बिल्डींग, जैन नगर, नवघर रोड, भाईंदर (पूर्व) यांची तपासणी दरम्यान एम. झेड शेख यांचे कागदपत्र तपासले असता सदर वैद्यकीय व्यावसायीक यांच्याकडे वैद्यकीय परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र नसल्याचे निर्देशनास आले होते.

सबब, एम. झेड शेख यांच्याकडे महाराष्ट्र भारतीय चिकीत्सा परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र नसताना बेकायदेशीररीत्या वैद्यकीय व्यावसाय करत असल्यामुळे त्यांच्यावर नागरी आरोग्य केंद्र, नवघर आरोग्य केंद्र येथील वैद्यकीय अधिकारी यांच्या तक्रारीवरुन नवघर पोलिस स्टेशन येथे दि.१८/०२/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच सदर मोहीम यापुढेही अशीच चालू ठेऊन उपरोक्त नमूद वैद्यकीय परिषदेकडे नोंदणी केल्याशिवाय कोणीही व्यक्ती मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात वैद्यकीय व्यावसाय करत असल्याचे निर्दशनास आल्यास सदर व्यक्ती विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात येईल.

**(डॉ. संभाजी पानपट्टे)**
**अतिरिक्त आयुक्त (सार्व.आ.वि.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**